# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

## (महसूल विभाग)

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

वाचा :- 1) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे निर्णय क्र.टंचाई-1099/प्र.क्र.12/ पापु-14, दिनांक 3/2/1999

2) शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई निर्णय क्र.टंचाई-1094/प्र.क्र.85/43, दिनांक 27/9/1994

3) शासन परिपत्रक पाणी पुरवठा विभाग क्र.टंचाई 1006/प्रक्र.106/पाप-14, दि.16/5/2016

4) शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे निर्णय क्र.टंचाई-2016/प्र.क्र.143/ पापु-14, दिनांक 4/5/2016

5) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र.जिप/ग्रापापु/लेखा/कावि/ 1868/2019, दिनांक 25/01/2019 (या कार्यालयास प्राप्त दि.29/1/2019)

6) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्र.जिपप/ग्रापापु/लेखा/कावि/ 1907/2019, दि.31/1/2019 (प्राप्त दि.3/2/2019)

जा.क्र.2019/आरबी/डेस्क/पाटं/सिआर-51 दिनांक 20/2/2019

विषय :- सन 2018-19 मधील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी नळ योजना विशेष दुरुस्ती करीता प्रशासकीय मान्यता देणे बाबत.

# ::आ दे श::

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडुन संदर्भ क्र.5 & 6 अन्वये पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी गंगाखेड तालूक्यातील खालील प्रमाणे नमुद गावातील नळ योजना विशेष दुरुस्तीचे कामे विहीत कालावधीत पुर्ण केल्यास गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटु शकेल. त्यानुसार नळ योजना विशेष दुरुस्ती उपाययोजनेचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता देण्यासाठी प्राप्त झाला आहे.

| क्र | तालूका | गाव/वाडी/ तांड्याचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | गंगाखेड | गौळवाडी तांडा | 52000.00 |
| 2 | गंगाखेड | बडवणी | 468800.00 |

नळ योजना विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव व अंदाजपत्रके संबंधीत उपविभागीय अधिकारी, ग्रा.पा.पु. उपविभाग, जि.प. यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन तयार केले असुन त्यांची तपासणी कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, परभणी यांनी करुन तांत्रिक मान्यता दिल्याचे दिसून येते.

सबब, संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक 3/2/1999 मधील तरतूदीनुसार खालील प्रमाणे परिशिष्टात नमुद गावातील नळ योजना विशेष दुरुस्तीच्या प्रस्तावास या आदेशान्वये संदर्भाधिन क्र.1 ते 4 च्या शासन निर्णयातील अटीच्या आणि खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्तीचा तपशिल

1) सदर उपायोजनाचे काम तातडीने पुर्ण करुन टंचाई काळातच ग्रामस्थांना त्याद्वारे पिण्याचे पाणी मिळेल यासाठी मु.का.अ., जि.प. आणि का.अ., ग्रा.पा.पु.वि., जि.प. यांनी नियोजन करुन योग्य त्या दर्जानुसार कामे पुर्ण होतील याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

(महसूल विभाग)

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

2) नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीची कामे हाताळण्याची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक 3/2/1999 मधील प्रपत्र-ड मध्ये दर्शविले प्रमाणे राहील.

3) नळ योजनाच्या विशेष दुरुस्तीसाठी लागणा-या साहित्याचे वेगळे रजिस्टर अद्यावत ठेवावे व इतिहास पुस्तिका ठेवण्यात यावी. व दरवर्षी होणा-या दुरुस्तींची नोंद इतिहास पुसितकेत घेण्यात यावी. इतिहास पुस्तीकेत पूर्वीच्या कामाची नोंद घेण्यात आली आहे याची खात्री मु.का.अ., जि.प. परभणी यांनी करावी. तसेच निकामी झालेल्या वस्तुची नोंद स्टॉक रजिस्टरला घेण्यात यावी.

4) विशेष दुरुस्तीचे काम ज्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे त्या पेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच विशेष दुरुस्ती वरील खर्च अवास्तव न करता वाजवी करण्यात यावा.

5) टंचाई कालावधीत नळ योजनेच्या विशेष दुरस्तीची कामे करुन पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेवरील खर्च जिल्हा परिषदेच्या नियमित फंडातुन करण्यात यावा.

6) प्रस्तावित नळ योजना विशेष दुरुस्तीसाठी सहायक भूवैज्ञानिक यांनी प्रपत्र अ/प्रपत्र ब मधील शिफारशीस अधिन राहुन व उक्त काम हे व्यवहार्य असल्याची खात्री जिल्हा परिषदेने केल्यामुळे देण्यात आली आहे.

7) स्त्रोतात पुरेसे पाणी उपलब्ध असल्याची इनवेल मशिनद्वारे खात्री करुनच नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम हाती घ्यावे.

8) सदर कामाचा खर्च करतांना वित्तीय अधिकार नियमावली, शासन निर्णय उद्योग ऊर्जा विभाग दि.1/12/2016, दि.24/8/2017, ई-निविदा व इतर अनुषंगीक शासन निर्णय, परिपत्रका प्रमाणे कार्यवाही करावी.

9) पाणी टंचाई निवारणार्थ कामे संबंधीत सक्षम ग्रामपंचायतला शासनाचे तदतूदीनुससार द्यावी. ग्रामपंचायत काम करण्यास तयार नसेल तर तशी ग्रामपंचायतकडुन लेखी विचारणा करुन घ्यावी किंवा सक्षम नसेल तर तसे प्रमाणित करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता अथवा शासनाचे इतर प्रचलित तरतूदीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी कार्यवाही करावी व कामे पूर्ण करावी.

10) कामे सुरु करण्यासाठी कार्यरंभ आदेश देण्यास कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी यांनी विलंब लावु नये. कार्यारंभ आदेश 2-3 दिवसाच्या आत संबंधीत अभिकरणास (एजन्सी) द्यावेत व ते खास दुतामार्फत तामील करावेत.

11) सदर कामाची सक्षम अधिका-यामार्फत तपासणी केल्यानंतरच बिले अदा करण्यात यावी. तसेच अचानकपणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कामाची तपासणी केली जाईल.

12) सदर योजना पुर्ण होत असतांनाचे व काम पुर्ण झाल्यानंतरचे Notecam app द्वारे लॉगीट्युट व लॅटीट्युड नमुद असलेले संबंधीत अभियंतासह फोटो काढुन एक प्रत अभिलेखात जतन करुन ठेवावेत व एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास आठ दिवसात सादर करावे.

परिशिष्ट

| क्र | तालूका | गाव/वाडी/ तांड्याचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1 | गंगाखेड | गौळवाडी तांडा | 52000.00 |
| 2 | गंगाखेड | बडवणी | 468800.00 |

सदरहू खर्च "मागणी क्र.सी-6, 2245- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, 01- अवर्षण, 102, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (91), राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानूसार खर्च, (91) (01), पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (2245 0093) (दत्तमत) (वेतनेतर) 31, सहायक अनुदाने" व "मागणी

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

## (महसूल विभाग)

Email ID- rdc.parbhani@maharashtra.gov.in Ph. No.02452-223702

क्र.सी-6, 2245-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, 01-अवर्षण, 102, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (92) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या कामनाकनूसार खर्च, (92) (01), पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (2245 2185) (दत्तमत) (वेतनेतर) 31, सहायक अनुदाने" या लेखाशिर्षामध्ये भागवावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

जिल्हाधिकारी, परभणी

प्रत - आवश्यक कार्यवाहीस्तव

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
2) कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, परभणी
3) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, परभणी
4) राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, जि.अ.का., परभणी यांना उक्त आदेशाची प्रत संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव
5) जिल्हा माहिती अधिकारी, परभणी
6) उपविभागीय अधिकारी, गंगाखेड
7) उप अभियंता (यांत्रिकी), ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी
8) उपविभागीय अधिकारी, ग्रा.पा.पु.उपविभाग, गंगाखेड (मार्फत का.अ., ग्रा.पा.पु.वि., जि.प., परभणी)
9) सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा कार्यालय, परभणी
10) तहसिलदार, गंगाखेड
11) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड

Signature Not Verified

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.02.21 17:52:14 IST
Reason: Approved